# सहसंचालक, तंत्र शिक्षण, प्रादेशिक कार्यालय,

**शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती ४४४ ६०३**

**E-mail:-roamravati.dte@gmail.com** **Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७९२४०**

**Website: www.jdroamt.org** **Fax No. : (०७२१) २५७७९१३**

तातडीचे /ईमेलव्दारे

क्रमांक:विकाअ/मा.अ./२०१५/ ९८५

दिनांक : २९/४/२०१५

प्रति,

प्राचार्य,
शासकीय अभि.महा.अमरावती/शा.औ.नि.शास्त्र महा.अमरावती
शासकीय तंत्रनिकेतन,अमरावती/यवतमाळ/वाशीम/खामगांव/मुर्तीजापुर
शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन यवतमाळ

विषय : माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत नागरीकांचे अर्ज Online पध्दतीने स्विकारण्याबाबत.
संदर्भ :संचालनालयाचे पत्र क.१६/आस्था/माहितीचा अधिकार/२०१५/१६८, दि.२२.४.२०१५

उपरोक्त विषयानुसार कळविण्यात येते की, संदर्भीय पत्रात दिलेल्या निदेशानुसार आपल्या संस्थेतील जबाबदार अधिका-यांची समन्वय अधिकारी (Nodel Officer) म्हणुन नियुक्ती करणे तसेच व्यवस्थापन प्रशासक (System Administrator) म्हणुन नियुक्ती करावयाची आहे. त्यानुसार आपल्या संस्थेतील जबाबदार अधिकारी यांची नियुक्ती करुन त्याबाबतची माहिती सोबतच्या पत्रातील प्रपत्रानुसार तात्काळ या कार्यालयास सादर करावी,जेणेकरुन माहिती संचालनालयास सादर करणे शक्य होईल.

सहपत्र: संदर्भीय पत्र

प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती

D:est/mahiti adhikar

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६१०६०२,२२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH E-mail :- desk16.dte@gmail.com Internet :- http//www.dte.org.in

अतितात्काळ

क्र.१६/आस्था/माहितीचा अधिकार/२०१५/१६८
दिनांक: २२।४।२०१५

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.

सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई.

विषय : माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत नागरिकांचे अर्ज Online पध्दतीने स्विकारण्याबाबत...
संदर्भ: उच्च व तंत्राशिक्षण विभाग यांचे पत्र क्र. माअअ-२०१५/प्र.क्र.६६-१५/आस्था-२, दिनांक १५.४.२०१५.

उपरोक्त विषयाबाबतचे संदर्भिस पत्र व सहपत्राची प्रत सोबत जोडली आहे.

सदर पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, संदर्भाधीन पत्रात नमूद केलेल्या माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत नागरीकांचे अर्ज Online पध्दतीने स्विकारण्याबाबत सुविधा राज्यातील सर्व कार्यालयास दि.१.४.२०१५ पासून राबविण्यात येणार आहे.

सदर सुविधेची गतीमान अंमलबजावणीसाठी आपल्या विभागांतर्गत सर्व संस्थेतील जबाबदार अधिकाऱ्यांची समन्वय अधिकारी (Nodal Offcer) म्हणुन नियुक्ती करणे तसेच व्यवस्थापन प्रशासक (System Administrator) म्हणून नियुक्ती करावयाची आहे. त्यासाठी आपल्या विभागांतर्गत संचालनालयाशी निगडीत सर्व शासकीय कार्यालयांतील तसेच सार्वजनिक प्रधिकारणे **(माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम २ (ज) मधील व्याख्येनुसार)** यामधील जन माहिती अधिकारी, प्रथम अपील अधिकारी, समन्वय अधिकारी (Nodal Offcer) तसेच व्यवस्थापन प्रशासक (System Administrator) यांची यादी सोबतच्या विवरणपत्राप्रमाणे जिल्हानिहाय **तात्काळ** मागवून घेऊन एकत्रित करावी व या संचालनालयाकडे Hard व Soft Copy उपलब्ध करुन द्यावी.

सदर माहिती सादर करणे ही संविधानिक जबाबतदारी असल्याने, तसेच माहिती शासनास कालमर्यादेत सादर करणे बंधनकारक असल्यामुळे विहीत नमुन्यातील आपल्या विभागाची संकलित माहिती बुधवार, दिनांक २२.४.२०१५ पुर्वी सादर करण्यात यावेत, जेणेकरुन सदर माहिती शासनास विहीत मुदतीत सादर करणे सुलभ होईल.

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत:१) श्री.रो.स. भालेकर, उपसचिव, म.रा. उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय,मुंबई-३२ यांना माहितीसाठी सादर .
२) कार्यासन क्रमांक ४, मुख्य कार्यालय, मुंबई. यांना आवश्यक कार्यावाहीसाठी.

# महाराष्ट्र शासन

क्र.माअअ-२०१५/प्र.क्र.६६-१५/आस्था-२
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग
मंत्रालय,मुंबई – ४०० ०३२
दिनांक : १८.४.२०१५

प्रति,

सहसचिव (व्यवसायशिक्षण),
उपसचिव (महाविद्यालयीन शिक्षण / विद्यापीठ शिक्षण / तंत्र शिक्षण / कला / ग्रंथालय ),
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.
कुलगुरु, सर्व अकृषिक विद्यापीठे , महाराष्ट्र राज्य.
संचालक ( उच्च शिक्षण / तंत्र शिक्षण / व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण / कला / ग्रंथालय )

विषय : माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत नागरिकांचे अर्ज Online पद्धतीने स्विकारण्याबाबत...

महोदय/महोदया,

सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१३/७७८/प्र.क्र.३९०/का. ०६, दिनांक १६.३.२०१५ च्या पत्राची प्रत सोबत जोडली आहे.

संदर्भाधीन पत्रात नमूद केलेल्या माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत नागरीकांचे अर्ज Online पद्धतीने स्विकारण्याबाबत सुविधा राज्यातील सर्व शासकीय कार्यालयास दिनांक १.४.२०१५ पासून राबविण्यात येणार आहे.

सदर सुविधेची गतीमान अंमलबजावणीसाठी राज्यातील सर्व शासकीय कार्यालयातील तसेच सार्वजनिक प्राधिकरणे यामधील जबाबदार अधिका-यांची समन्वय अधिकारी ( Nodal Officer ) म्हणून नियुक्ती करणे तसेच व्यवस्थापन प्रशासक (System Administrator) म्हणून नियुक्ती करावयाची आहे.

त्यासाठी राज्यातील सर्व शासकीय कार्यालयातील तसेच सार्वजनिक प्राधिकरणे (माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (ज) मधील व्याख्येनुसार ) यामधील जन माहिती अधिकारी, प्रथम अपील अधिकारी, समन्वय अधिकारी (Nodal Officer) तसेच व्यवस्थापन प्रशासक (System Administrator) यांची यादी सोबतच्या विवरणपत्राप्रमाणे आपल्या अधिपत्याखालील सर्व शासकीय कार्यालयांनी तसेच सार्वजनिक प्राधिकरणांकडून जिल्हानिहाय व तालुकानिहाय गावपातळी पर्यंत तात्काळ मागवून घेऊन एकत्रित करावी व या विभागाकडे तसेच संचालक, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय यांचेकडे Hard व Soft copy उपलब्ध करुन द्यावी अशी विनंती सामान्य प्रशासन विभागाने केलेली आहे.

सामान्य प्रशासन विभागाच्या पत्रासोबतच्या विवरणपत्रात माहिती तात्काळ भरुन आस्था-२ कार्यासनाकडे पाठवावी तसेच Online R.T.I. सुविधेच्या गतीमान अंमलबजावणीसाठी प्रशासकीय विभागांनी वरील बाब त्यांच्या अधिपत्याखालील सर्व प्रादेशिक विभाग प्रमुख/विभाग प्रमुख यांच्या निदर्शनास तात्काळ आणावी व त्याप्रमाणे करण्यात येत असलेल्या कार्यवाहीचे समन्वयन (monitoring) करावे. उपरोक्त माहिती तातडीने तयार होणे, माहिती अधिकारी, अपील प्राधिकारी, समन्वय अधिकारी (Nodal Officer) तसेच व्यवस्थापन प्रशासक (System Administrator) यांची नियुक्ती होणे, याबाबत कार्यवाही करुन माहिती दिनांक २१.४.२०१५ पर्यंत सादर करावी, ही विनंती.

आपली,

(रो. स. भालेकर)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

C:\Users\shirish.padolya\Documents\क्र.GR_६६_२०१५.docx

१०२९३
21/04/15
१८

माहितीचा अधिकार

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
१६ वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२.
दुरध्वनी क्र. ०२२-२२०२१५४३

13 MAR 2015

क्र. संकीर्ण २०१३/७७८/प्र.क्र. ३१०/का.०६ दिनांक : १६.३.२०१५.

4294

प्रति,
सर्व उपसचिव (आस्थापना)/ माहिती अधिकार समन्वयक,
सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.

विषय:-माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत नागरिकांचे अर्ज online पध्दतीने स्वीकारण्याबाबत.

महोदय/महोदया,

आपणास विदित आहेच की, मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या निर्देशानुसार Online R.T.I. ही सुविधा मंत्रालयीन सर्व विभागात दि.१.१.२०१५ पासून सुरू करण्यात आली असून आता सदर सुविधा राज्यातील सर्व शासकीय कार्यालयात दि.१.४.२०१५ पासून राबविण्यात येणार आहे. सदर सुविधेच्या गतीमान अंमलबजावणीसाठी राज्यातील सर्व शासकीय कार्यालयातील तसेच सार्वजनीक प्राधिकरणे (माहिती अधिकार अधिनियम २००५मधील कलम २(ज) मधील व्याख्येनुसार) यामधील जबाबदार अधिकाऱ्यांची समन्वय अधिकारी (Nodal Officer) म्हणून नियुक्ती करणे व विभागात/कार्यालयात प्राप्त होणाऱ्या online अर्ज/प्रथमअपील संबंधित जन माहिती अधिकारी/प्रथम अपील प्राधिकारी यांना पाठविण्यासाठी सर्व शासकीय कार्यालयातील तसेच सार्वजनीक प्राधिकरणे (माहिती अधिकार अधिनियम २००५मधील कलम २(ज) मधील व्याख्येनुसार) जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांची व्यवस्थापन प्रशासक (System Administrator) म्हणून नियुक्ती करावयाची आहे.

३. त्यासाठी राज्यातील सर्व शासकीय कार्यालयातील तसेच सार्वजनीक प्राधिकरणे (माहिती अधिकार अधिनियम २००५मधील कलम २(ज) मधील व्याख्येनुसार) यामधील जन माहिती अधिकारी, प्रथम अपील प्राधिकारी, समन्वय अधिकारी (Nodal Officer) तसेच व्यवस्थापन प्रशासक (System Administrator) यांची यादी सोबतच्या विवरणपत्राप्रमाणे आपल्या अधिपत्याखालील सर्व शासकीय कार्यालयांनी तसेच सार्वजनीक प्राधिकरणांकडून जिल्हानिहाय व तालुकानिहाय गावपातळी पर्यंत तात्काळ मागवून घेऊन एकत्रित तयार करावी व या विभागाकडे तसेच संचालक, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय यांचेकडे Hard व Soft copy मध्ये उपलब्ध करून द्यावी अशी विनंती आहे. आपल्या अधिपत्याखालील गावपातळीवरील ज्या-ज्या कार्यालयांमध्ये फक्त जन माहिती अधिकारी आहे त्यांचा समन्वय अधिकारी (Nodal Officer) कोण असेल याबाबतचा निर्णय संबंधित विभागाने स्वाधिकारे घ्यावा व त्याप्रमाणे माहितीत समावेश करावा. कारण संबंधीत जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय प्राधिकारी यांना अग्रेषीत केलेले माहिती अर्ज/प्रथम अपील, त्यांच्या समन्वय (Nodal Officer) अधिकाऱ्यांकडे Online प्राप्त होतील व ते त्यांनी तात्काळ वितरीत करावयाचे आहेत.

४. सर्व जन माहिती अधिकारी, प्रथम अपील प्राधिकारी, समन्वय अधिकारी (Nodal Officer) तसेच व्यवस्थापन

बैठकीची सूचना

सूचना का अधिकार

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
१९ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२.
दूरध्वनी क्र. ०२२-२२०४९५४३

क्र. संकीर्ण २०१३/७७८/प्र.क्र. ३९८ /का.०६ दिनांक :१५/४/२०१५.

प्रति,

सह सचिव/उप सचिव (आस्थापना/ माहिती अधिकार),
नियोजन विभाग, महसूल व वन विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, आदिवासी विकास विभाग, गृहनिर्माण विभाग, अन्न , नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, महिला व बाल कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई.

विषय:-माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत नागरिकांचे अर्ज online पध्दतीने स्वीकारण्याबाबत.

महोदय/महोदया,

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत नागरिकांचे अर्ज online पध्दतीने स्वीकारण्याकरीता व त्यांना संबंधीत माहिती देण्याच्या सुविधेकरिता शासनाने rtionline.maharashtra.gov.in या नावाचे portal सुरू केले आहे.सदर सुविधा मंत्रालयीन स्तरावर कार्यान्वीत करण्यात आली असून आता ती संपूर्ण महाराष्ट्रात राबवावयाची आहे.

ही कार्यवाही करण्यासाठी, आपल्या विभागाअंतर्गत सर्व कार्यालये, सार्वजनिक प्राधिकरणे येथील नोडल ऑफीसर , जन माहिती अधिकारी , प्रथम अपिलीय अधिकारी यांची विहीत तक्त्यातीलमाहिती संकलीत करून (Hard and soft copy) या विभागास तसेच माहिती व तंत्रज्ञान विभागास तात्काळ उपलब्ध करून देण्याची विनंती समक्रमांक दि,.१६/३/२०१५ च्या पत्रान्वये करण्यात आली होती. ही सुविधा प्राथम्य स्तरावर कार्यान्वीत करावयाची असल्याने, उक्त पत्राच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेण्याकरीता अपर मुख्य सचिव (र. व का. ) याच्या दालनात (दालन क्र. १०२- विस्तार, पहिला मजला, मंत्रालय, मुंबई ३२ ) दि. २३/०४/२०१५ रोजी दुपारी ४.०० वाजता बैठक आयोजित करण्यात आलेली आहे. सदर बैठकीस कृपया आवश्यक माहितीसह उपस्थित रहावे.

आपला,

(स्वाक्षरी)

(र. व. गुरव)
शासनाचे उप सचिव

(कृमाप)

[Type here]
ONLINE R.T.I.४/१५/२०१५

... Administrator) यांना राष्ट्रीय सूचना केंद्र (N.I.C.) किंवा माहिती व तंत्रज्ञान विभागाकडून आवश्यक ... शासकीय email address वरूनच Online R.T.I. ची सुविधा राज्यातील सर्व शासकीय कार्यालयात ... आहे.

... R.T.I. सुविधेच्या गतीमान अंमलबजावणीसाठी सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी वरील बाब त्यांच्या ...तील सर्व प्रादेशिक विभाग प्रमुख/ विभाग प्रमुख यांच्या निदर्शनास तात्काळ आणावी व त्याप्रमाणे करण्यात येत ... कार्यवाहीचे समन्वयन (monitoring) करावे. उपरोक्त माहिती तातडीने तयार होणे, माहिती अधिकारी, अपील ..., समन्वय अधिकारी (Nodal Officer) तसेच व्यवस्थापन प्रशासक (System Administrator) यांची नियुक्ती होणे ...ची जबाबदारी सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांची राहील याची कृपया नोंद घ्यावी.

आपला,

(र.व.गुरव)
शासनाचे उप सचिव

प्रत माहितीस्तव.-

श्रीमती ललिता दीक्षित, राष्ट्रीय सूचना केंद्र,११ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मुंबई.

श्री.आलोक मिश्र, तंत्रज्ञ, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, ७ वा मजला, विस्तार इमारत, मंत्रालय मुंबई.

कार्यासन ६, संग्रहार्थ.

## Maharashtra RTI Online

Statement of Nodal Officer, Public Information Officer/First Appellate Authority and System Administrator

Name of Department and Name of the Office or Public Authority-

| Sr.No | Name of Nodal Officer, Public Information Officer/ First Appellate Authority and System Administrator | Designation in office | Nodal Officer, Public Information Officer/First Appellate Authority and System Administrator | Landline/ Mobile Number | E-mail Address given by NIC or IT. |
|---|---|---|---|---|---|
| 1. | 2. | 3. | 4. | 5. | 6. |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

प्रत- श्रीमती ललिता दीक्षित / सुमन गीरी, राष्ट्रीय सूचना केंद्र,११ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मुंबई.
श्री.अनुप मिश्र, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, ७ वा मजला, विस्तार इमारत, मंत्रालय मुंबई.
कार्यासन ६, संग्रहार्थ.